# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:04.10.2024** **वार:शुक्रवार**

---

1. मराठीसह बंगाली, आसामी, प्राकृत, आणि पाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
2. कृषी क्षेत्रासाठी 1 लाख कोटी रुपयांची तरतूद असलेल्या दोन योजनांनाही मंत्री मंडळाची मंजुरी
3. तेलबिया आणि खाद्यतेल निर्मितीसाठी विशेष राष्ट्रीय अभियानाची घोषणा
4. कौटिल्य आर्थिक परिषद आजपासून नवी दिल्लीत आणि
5. महिला टी-20 विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना न्यूझीलंडबरोबर

**अभिजात भाषा**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती देताना सांगितलं. मराठीसह बंगाली, आसामी, प्राकृत, आणि पाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला. केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर अवघ्या मराठी साहित्य विश्वातून आनंदाची भावना व्यक्त होत आहे. एक वृत्तांत.....

**अमृताशीही पैज जिंकणाऱ्या माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय हा महाराष्ट्रासह अवघ्या जगभरातल्या मराठी जनांसाठी सुवर्ण क्षण आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मराठी साहित्यिक आणि भाषा अभ्यासकांनी ही मागणी लावून धरली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी एक चळवळच उभी करण्यात आली होती. मराठी साहित्य संमेलनांमधून अनेकदा ठराव करण्यात आले; राज्य सरकारने ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समितीदेखील नेमली होती. या समितीने अत्यंत अभ्यासपूर्ण अहवाल केंद्राकडे सादर केला होता. अभिजात भाषेचे विविध निकष मराठीला लागू होतात; याबाबतचे पुरावे या अहवालात देण्यात आले होते. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवा यासाठी राष्ट्रपतींना एक लाख पत्रही पाठवण्यात आली होती. या सर्व प्रयत्नांना काल अखेर यश आलं. या निर्णयानंतर मराठी साहित्य विश्वासतून आनंदाची भावना व्यक्त होत आहे. राज्य सरकारनंही केंद्राचे आभार मानले आहेत. प्रत्येक मराठी प्रेमी व्यक्ती आज आपल्या माय मराठीचं अभिमान गीत गुणगुणत असेल.... लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी..... आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून माधवी कुलकर्णी**

**कृषी-योजना**

शाश्वत कृषी क्षेत्रासाठी पंतप्रधान राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि अन्नसुरक्षेसाठी स्वयंपूर्ण होण्याच्या उद्देशाने कृषि उन्नती योजना अशा दोन योजनांना केंद्रिय मंत्रीमंडळाने काल मंजुरी दिली. या दोनही योजनांसाठी एकंदर 1 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती केंद्रिय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांशी बोलताना दिली. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणं आणि मध्यम वर्गीयांना अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी या योजना आधारस्तंभ ठरतील असं ते म्हणाले. उर्जा क्षेत्रातील शाश्वत हरित विकास आणि कार्बन वायू उत्सर्जन कमी करण्याच्या प्रयत्नांसाठी भारत वचनबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर जगभरात ऊर्जा कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासाठी काम करणाऱ्या संघटनेत सहभागी होण्याच्या उद्देशाने मंत्रिमंडळ बैठकीत परवानगी देण्यात आली. यासह चेन्नई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यालाही मंजुरी देण्यात आली.

**तेलबिया**

2024-25 ते 2030-31 या 7 वर्षांसाठी तेलबिया आणि खाद्यतेल निर्मितीसाठी 10 हजार 103 कोटी रुपयांच्या खर्चाच्या राष्ट्रीय अभियानालाही केंद्रिय मंत्रीनंडळानं काल मान्यता दिली. पुढील सात वर्षांत भारताला तेलबिया उत्पादनात स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवण्यात येणार असल्याचं अश्विनी वैष्णव यानी सांगितलं. मोहरी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल आणि तीळ यासारख्या प्रमुख प्राथमिक तेलबिया पिकांचे उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. कापूस बियाणे, तांदूळाचा भुसा आणि वृक्षजन्य तेल यांसारख्या इतर स्त्रोतांपासून तेलनिर्मिती वाढवण्यावर भर दिला जाईल. 2022-23 मध्ये तेलउत्पादनाची 39 दशलक्ष टन असलेली क्षमता वाढवून एकंदर 70 दशलक्ष टन करण्याचं या अभियानाचं उद्दिष्ट आहे. 2030-31 पर्यंत उत्पादन वाढल्यास खाद्यतेलाची देशांतर्गत मागणी 72 टक्के पूर्ण केली जाईल. असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला.

**उत्पादकता-बोनस**

केंद्रीय मंत्रिमंडळाने 11 लाख, 72 हजार रेल्वे कर्मचाऱ्यांना 78 दिवसांचा उत्पादकता बोनस देण्यालाही मंजुरी दिली आहे. यासाठी एकंदर 2 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

**कौटिल्य-आर्थिक-परिषद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी नवी दिल्लीत कौटिल्य आर्थिक परिषदेला संबोधित करणार आहेत. आजपासून 6 ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या परिषदेची ही तिसरी आवृत्ती आहे. हरित कार्यपध्दतीला अर्थसहाय्य, जैव-आर्थिक क्षेत्राला प्रोत्साहन देणं आणि विकासावर होणारे परिणाम, पर्यावरणपूरक बदल टिकवून ठेवण्यासाठी धोरणात्मक कृती आणि तत्त्वं कोणती असावीत या विषयांवर परिषदेत भर दिला जाणार आहे. देशपरदेशातील आंतरराष्ट्रीय अभ्यासक आणि धोरणकर्ते भारतीय अर्थव्यवस्था आणि जागतिक अर्थव्यवस्थांसमोरील काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करतील. कौटिल्य कौटिल्य आर्थिक परिषदेचं आयोजन आर्थिक विकास संस्था ग्रोथ आणि अर्थ मंत्रालय यांनी संयुक्तपणे केलं आहे.

**त्रिस्तरीय-करार**

भारत, नेपाळ आणि बांग्लादेशनं त्रिस्तरीय करारावर काल काठमांडू इथं स्वाक्षरी केली. यामुळे नेपाळमध्ये उत्पादित होणारी वीज बांग्लादेशला भारतीय पॉवर ग्रीडद्वारे पोहोचवली जाणार आहे. नेपाळनं उत्पादित केलेली वीज प्रथमच बांग्लादेशात आयात होणार आहे. आतापर्यंत नेपाळ केवळ भारताला वीज निर्यात करत आहे, बांगलादेश आता नेपाळकडून 40 मेगावॅट वीज आयात करणार आहे. सध्या नेपाळ 400 किलोवॅट ढालकेबर-मुझफ्फरपूर सीमाभागातील ट्रान्समिशन लाइनद्वारे भारताला ऊर्जा पाठवेल आणि त्यानंतर भारत बांगलादेशला पुरवठा करेल. नेपाळ आणि बांगलादेश यांच्यातील ऊर्जा व्यापारासाठी प्रस्तावित मार्गाचा तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करण्यावरही दोन्ही देशांनी सहमती दर्शविली आहे.

**हरियाणा निवडणूक**

हरियाणा विधानसभेच्या 90 जागांसाठी उद्या एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली असून निवडणुका सुरळितपणे पार पडाव्यात यासाठी 20 हजार 632 मतदान केंद्रांची सोय करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी 1 हजार 31 उमेदवार रिंगणात आहेत. त्यामध्ये 930 पुरूष आणि 101 महिला उमेदवारांचा समावेश आहे. उद्या सकाळी 7 वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार असून संध्याकाळी 6 वाजता ते संपेल. राज्यात जवळपास 2 कोटी 3 लाख 54 हजार पात्र मतदार असल्याचं हरियाणाचे मुख्य निवडणूक अधिकारी पंकज अगरवाल यांनी सांगितलं. काल संध्याकाळी या निवडणुकीचा प्रचार संपला.

**जयशंकर**

इपरराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आज श्रीलंकेच्या अधिकृत दौऱ्यावर जात आहेत. त्यांच्या या दौऱ्यात ते श्रीलंकेच्या नेतृत्वाची भेट घेणार आहेत. भारताच्या शेजारधर्म प्रथम या धोरणानुसार तसंच सागर दृष्टिकोनाला अनुसरून दोन्ही देशांचे पूर्वीपासूनचे संबंध अधिक बळकट करण्याच्या सामायिक बांधिलकीवर या दौऱ्यात प्रकर्षानं भर दिला जाईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून सांगण्यात आलं.

**लेबनन**

लेबननची राजधानी बैरुतवर काल रात्री इस्त्रायलनं हल्ले केले. या हल्ल्यात किमान नऊ जण जणांचा मृत्यू झाला असून दक्षिण लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्राचा बफर झोन असलेल्या उत्तरेला नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचा इशारा देण्यात आला आहे. लेबनानच्या सैन्यानं पहिल्यांदाच इस्रायली सैनिकांवर थेट मैदानात उतरुन गोळीबार केला. यामुळे संघर्षाला काल नवे वळण लागले. या चकमकीत लेबनानी सैन्याचे दोन जवान ठार झाल्याचं प्रथमिक वृत्त आहे. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी इराणच्या तेल तळांवर इस्रायलच्या संभाव्य हल्ल्यांबाबत चर्चा सुरु आहे असा खुलासा केला. मात्र, इराणच्या आण्विक प्रकल्पांवर कोणत्याही प्रकारच्या हल्ल्याला आपला विरोध असल्याचं स्पष्ट केलं. इराणने नुकत्याच केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर इस्रायलने आपण प्रत्युत्तर देणार असल्याचं सांगितलं होतं पार्श्वभूमीवर ही चर्चा होत आहे.

**क्रिकेट**

शारजा इथं कालपासून सुरू झालेल्या महिलांच्या टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना न्यूझीलंडबरोबर होणार आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर या स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे. आज संध्याकाळी दुबई इथं होणाऱ्या या सामन्याचं थेट वर्णन आकाशवाणीवरून हिंदी आणि इंग्रजीतून प्रसारित केलं जाणार आहे. या स्पर्धेतला आणखी एक सामना आज दुपारी वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात होणार आहे. ही स्पर्धा येत्या 20 तारखेपर्यंत चालणार असून त्यामध्ये दहा संघ उतरले आहेत. तत्पूर्वी काल सलामीच्या सामन्यात बांगलादेशानं स्कॉटलंडवर 16 धावांनी विजय मिळवला. तर पाकिस्ताननं श्रीलंकेला 31 धावांनी पराभूत केलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार